# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**शासनाच्या जिल्हास्तरीय करप्रणालीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यभर सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याबाबत**

**(१) १६५०२ (१६-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील मालमत्तांचे नव्याने सर्व्हेक्षण करुन उपलब्ध मालमत्तांची माहिती संगणकावर अपलोड करण्यात येत असून लवकरच पाणी पट्टी व घरपट्टीच्या बिलींगसाठी संगणकीकरण करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या जिल्हास्तरीय करप्रणालीमध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यभर सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०१८) :** (१) धुळे जिल्ह्यातील नगरपरिषदांच्या मालमत्तांचे नव्याने सर्व्हेक्षण व संगणकीकरण करण्यात आले नाही.

(२) व (३) राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या हद्दीतील मालमत्तांचे जी.आय.एस. प्रणालीवर आधारित सर्व्हेक्षण व मॅपिंग नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

---

**मावळ (जि.पुणे) तालुक्यतील १९२ महसुली गावापैंकी १९ महसुली गावातील गावठाणाचा सिटी सर्व्हे केला असल्याबाबत**

**(२) ३२८९६ (२३-१२-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यतील १९२ महसुली गावापैंकी आजपर्यंत १९ महसुली गावातील गावठाणाचा सिटी सर्व्हे केला असून जागामालकांना भूमी अभिलेख कार्यालयाकडून मालकी हक्काने नकाशे व उतारे देण्यात आले आहेत.तसेच ग्रामपंचायतीला बांधकाम नोंदणींचे अधिकार नसल्याने बांधकामे थांबली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० या वर्षापासुन ग्रामपंचायतीच्या हद्दीत होणाऱ्या बांधकामाची परवानगी ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असल्यामुळे बांधकाम सुरु करु इच्छिणाऱ्या ग्रामस्थांना बांधकाम परवानगी मिळण्यास अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम परवानगी घेण्यासाठी ग्रामीण भागात गावठाणात राहणाऱ्या नगरिकांसाठी सिटी सर्व्हे न झाल्याने तसेच मालकी हक्काचा उतारा व नकाशा न मिळाल्याने भूमिपुत्रांना बांधकाम परवान्यापासून वंचीत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामस्थांकडून मागणी होत असल्यामुळे ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगीचे अधिकार देण्याबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय झाला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, पुणे यांनी महानगरपालिका/नगरपालिका हद्दीबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगीबाबत दि.१०/०२/२०१० रोजीचे परिपत्रक क्र.पमह/कावि/३८३/२०१०, निर्गत केले आहे. त्यामध्ये अशा क्षेत्राकरिता बांधकाम परवानगी देण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी, पुणे यांना होते.

शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये दिनांक २७/१२/२०१४ रोजी सुधारणा केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ५२ नुसार तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ नुसार गावठाण क्षेत्रातील बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवचैतन्य सोसायटी, वारजे जकातनाका येथे कोणतीही परवानगी न घेता मोबाईल टॉवर बसविण्यात आल्याबाबत**

**(३) ३३२५८ (११-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला मतदारसंघातील नवचैतन्य सोसायटी, वारजे जकातनाका मध्ये कोणतीही परवानगी न घेता मोबाईल टॉवर बसविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने शासनाच्या संबंधित खात्याकडे मोबाईल टॉवर नियमान्वित करण्याचा प्रस्ताव सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून नविन टॉवर परवाना व अस्तित्वातील टॉवर नियमान्वित करण्याबाबत नियमावली प्रसिद्ध केली असून त्यानुसार दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ ही टॉवर नियमान्वित करण्यासाठी शेवटची मुदत दिली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, दिलेल्या मुदतीत नवचैतन्य सोसायटी, वारजे जकातनाका येथे बसविलेला टॉवर नियमावलीतील तरतुदीनुसार नियमान्वित करून घेतला नसतानाही शासनाकडून सदर टॉवर काढण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास सदरचा टॉवर काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०१८) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) सदर मोबाईल टॉवर नियमान्वित करणेसाठीचा प्रस्ताव संबंधित कंपन्यांनी विहित मुदतीनंतर दि.०२/०१/२०१५ रोजी दाखल केलेला होता तथापि सदर प्रस्तावात पुणे महानगरपालिकेने दि. ०४/०२/२०१५ रोजी त्रुटी कळविलेल्या आहेत.

या प्रकरणातील (१) मे.सेल्युलर ऑपरेटर ऑफ इंडिया (२) इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर्स असोसिएश्न या दोन संस्थांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२०४३/२०१४ व २०४७/२०१४ दाखल करुन दि.४/३/२०१४च मोबाईल टॉवर नियमावलीस आव्हान दिलेले असून त्यामध्ये अस्तित्वातील टॉवरवर कोणतीही विपीत कारवाई करु नये असे मा.उच्च न्यायालयाने दि.१२/०९/२०१४ रोजी आदेश दिलेले नसल्याने महानगरपालिकेस कारवाई करता आलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मांजरी बु. (ता.हवेली, जि.पुणे) येथील स. न. ३४ ते ४०, ५७ ते ६०, व ६३ या क्षेत्राचा रहिवासी विभागात समावेश करणेबाबत

**(४) ३४३८६ (२७-०१-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांजरी बु. (ता.हवेली, जि.पुणे) येथील स. न. ३४ ते ४०, ५७ ते ६०, व ६३ या क्षेत्राचा दिनांक ०७ ऑगस्ट, २००० च्या अधिसुचने नुसार रहिवासी विभागात समावेश केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे क्षेत्राचा सन २००१ मध्ये शेती व ना विकास विभागात पुन्हा समावेश केला म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी हे क्षेत्र पुन्हा रहिवासी विभागात समाविष्ट करावे अशी मागणी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील क्षेत्र रहिवासी विभागात करण्यासाठी शेतकऱ्यांना पूर्णपणे शुल्क माफी द्यावी अशी ही मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) शासनाने प्रादेशिक योजनेमधील जमिन वापर फेरबदलाच्या धोरणास मान्यता दिली असून त्यानुसार कार्यपध्दती व अधिकाराचे प्रत्यायोजन करण्या संबंधी शासन निर्णय दि. ०६/०५/२०१६ रोजी निर्गमित केला आहे. या धोरणानुसार अधिमूल्य आकारुन जमिन वापर बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीस प्रदान करण्यात आले आहेत. जमिन वापर बदल करण्यासंबंधी विभागीय स्तरावरील समितीकडे संबंधितांनी अर्ज करणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ज्येष्ठ नागरिकांना प्रवासी सेवेत सवलतीने प्रवास करण्यासाठी तहसिलदारांनी दिलेले ओळखपत्र ग्राहय धरण्याबाबत**

**(५) ४८४३१ (१७-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ज्येष्ठ नागरिकांना महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण वाहतूक क्षेत्रात तहसिल कार्यालयातून मिळणारे ज्येष्ठ नागरिकांचे ओळखपत्र प्रवासी सवलतीसाठी ग्राहय धरावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वाहतूक क्षेत्रात बीएसटी, टीएमटी,एनएमएमटी व केडीएमटी परिवहन सेवेतून प्रवास करताना प्रत्येक परिवहन सेवेचे ओळखपत्र नसल्यामुळे ज्येष्ठ नागरीकांना प्रवास सवलत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्यासाठी तहसीलदारांनी दिलेले प्रवास सवलत ओळखपत्र ग्राहय धरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमांतर्गत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना नियमित प्रवास भाड्यात कोणतीही सवलत देण्यात येत नाही. मात्र मासिक व त्रैमासिक बस पासेसमध्ये सवलत देण्यात येते. या सवलतीकरीता ज्येष्ठ नागरिकत्व सिद्ध करणारे शासनाचे कोणतेही ओळखपत्र गाह्य धरण्यात येते.

• नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या ६५ वर्षे वयावरील ज्येष्ठ नागरिकांना वयाच्या पुराव्यासाठी शाळेचा दाखला, जन्म तारखेचा दाखला, तहसिलदारांनी दिलेला दाखला, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला दाखला, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र किंवा शासनाने दिलेला दाखला सादर केल्यानंतर, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्यात येते. हे ओळखपत्र असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्याच्या ७५ टक्के सवलत देण्यात येते.

• कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर व वसई-विरार या तिन्ही महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांनी तहसिलदार दाखल्याव्यतिरिक्त वयाचा पुरावा असलेले कोणतेही एक ओळखपत्र सादर केल्यास त्यांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते.

• ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेकडून ठाणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्यात येते. या ओळखपत्राच्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना मासिक पासाच्या भाड्यात २० टक्के सवलत देण्यात येते.

• तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या साध्या व निमआराम बसेसमध्ये ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घारापुरी बेटालगत असलेल्या मच्छीमारांना पर्यायी व्यवसाय व अर्थसहाय्य शासनाने देण्याबाबत मच्छीमार व संघटनांनी केलेली मागणी

**(६) ६५८६१ (२७-०१-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणा-या शिवडी-न्हावा पुलामुळे घारापुरी बेटालगत असलेल्या मच्छीमारांचा मच्छीमारीचा व्यवसाय बंद पडणार असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी सदर मच्छीमारांना पर्यायी व्यवसाय व अर्थसहाय्य शासनाने करावे अशी मच्छीमार व त्यांच्या संघटनांनी शासनाकडे तसेच उरणचे तहसिलदार यांच्याकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर मच्छीमारांना पर्यायी व्यवसाय व अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) मच्छीमार व त्यांच्या संघटनांची निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे शिवडी ते न्हावा या मुंबई पारबंदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून, सदर प्रकल्पामुळे बाधित होऊ शकणारा मच्छीमारीचा व्यवसाय लक्षात घेता, प्रकल्पबाधित मच्छीमारांकरीता मच्छीमार नुकसान भरपाई धोरण तयार करण्यासाठी प्राधिकरणाने समन्वय समितीची नियुक्ती केली आहे. मच्छीमार व त्यांच्या संघटांनी दिलेली निवेदने व त्यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदर समितीने प्रकल्पबाधित मच्छीमारांकरीता मच्छीमार नुकसान भरपाई धोरण तयार केले आहे.

प्रकल्पामुळे बाधित होऊ शकणाऱ्या मच्छीमारांचे प्राधिकरणामार्फत सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. त्यासाठी प्रकल्पाच्या प्रभावक्षेत्रातील २० गावांमध्ये कॅम्प घेण्यात आले असता, सुमारे ४२६४ मच्छीमार कुटुंबांकडून माहिती प्राप्त झाली. या सर्व्हेक्षणाच्या पहिल्या फेरीमध्ये मत्स्य विभागाने ११९२ मच्छीमार कुटुंबांना पात्र ठरविले आहे.

नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या मच्छीमारांना नुकसान भरपाईचे वाटप सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई उपनगरे यांच्यामार्फत करण्यात येणार असून नुकसान भरपाईचा निधी मत्स्यव्यवसाय विभागाकडे लवकर वर्ग करण्यात येत आहे.

उर्वरित ३०४२ मच्छीमारांची पात्रता छाननी चालु असून, पात्र मच्छिमारांची यादी व माहिती मत्स्यव्यवसाय विभागाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.

मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या शिवडी ते न्हावा या समुद्रातील लांबीमध्ये डोल / सस् यांच्या मदतीने मासेमारी करणारे मच्छीमार (C-१ Category) यांचे सर्व्हेक्षण मत्स्य व्यवसाय विभागासोबत संयुक्तीकरित्या सुरु करण्यात आलेले असून, या गटातील मच्छीमार कायमस्वरुपी विस्थापित होत असून, त्यांचे सर्व्हेक्षण मार्च, २०१८ अखेर पर्यंत पूर्ण करुन सदर मच्छीमारांची यादी व माहिती मत्स्यव्यवसाय विभागाकडे प्राधिकरणामार्फत मंजूरीस्तव सादर करण्याचे नियोजित आहे.

यामधील पात्र मच्छीमारांना दुसऱ्या फेरीमध्ये नुकसान भरपाई अदा करण्याचे नियोजित आहे.

---

### नवी मुंबईतील नेरूळ येथील डी.वाय.पाटील रुग्णालयाची नोंदणी रद्द करण्यात आल्याबाबत

**(७) ८०४५७ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील नेरूळ येथील डी.वाय.पाटील रुग्णालयाची नोंदणी रद्द केली असतानाही हे रुग्णालय सुरू ठेवण्यात आल्याने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनापरवाना काम करणा-या या रुग्णालयावर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८)** : (१) व (२) विनानोंदणी रूग्णालय चालू असल्याचे निदर्शनास आल्याने नेरूळ येथील डॉ.डी.वाय.पाटील रूग्णालय आणि रिसर्च सेंटर, या रूग्णालया विरूध्द दि. १५.११.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे.

तथापि, रूग्णालयाने नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रे महानगरपालिकेस सादर केल्यानंतर दि.१५.११.२०१७ रोजी महापालिकेकडून सदर रूग्णालयास पुर्ननोंदणी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील अत्यंत जुन्या व जीर्ण अवस्थेत असलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत**

**(८) ८५८२६ (०१-०९-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अत्यंत जुन्या व जीर्ण अवस्थेत असलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातील अडचणी सोडविण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून पुनर्विकासाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे,

(२) असल्यास, सन १९६८ मध्ये शासनाने नेमलेल्या बेडेकर समितीच्या अभ्यासगटाने उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीबाबत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, सद्यःस्थितीत पुनर्विकास व दुरुस्ती याबाबतचे शासनाचे नवीन धोरण तयार होण्यास किती कालावधी लागणार आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन १९६८ मध्ये शासनाने नेमलेल्या बेडेकर समितीच्या अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार मुंबई शहर बेटावरील सुमारे १९६४२ इमारतींच्या दुरुस्ती/ पुनर्बांधणीची जबाबदारी स्विकारली व ती पार पाडण्याकरीता मुंबई घरदुरस्ती व पनुर्रचना कायदा १९६९ मंजूर करून त्याअन्वये मुंबई घरदुरुस्ती व पनुर्रचना मंडळाची स्थापना होऊन हे मंडळ सन १९७१ मध्ये कार्यरत झाले. त्यानुसार मुंबई शहर बेटावरील जुन्या उपकरप्राप्त इमारतींची दुरूस्ती व पुनर्विकास मुंबई इमारत दुरुस्ती व पनुर्रचना मंडळ यांचेकडून करण्यात येते.

(३) शासनाच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ०८ विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांच्या समितीची दि.१९/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीमधील चर्चेनुसार समितीतील सदस्यांनी शासनास शिफारसी सादर केल्या असून त्यानुसार म्हाडाकडून विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) व तसेच म्हाड अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. त्यानुसार करावयाच्या सुधारणांबाबत समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जुन्या चाळीतील भाडेकरुंच्या पात्रतेबाबतची परिपत्रके पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबत

**(९) ८५९६० (०१-०९-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या चाळीतील भाडेकरुंच्या पात्रतेबाबत सन २०१० व २०१३ ची परिपत्रके पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबतचा शासनाकडे प्रलंबित प्रस्तावाला म्हाडाच्या गृहनिर्माण विभागाने सहमती दाखवली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतल्यास त्याचा फायदा दक्षिण मुंबईतील विकासकांना होणार असून त्यांना अनेक जुन्या प्रकल्पात दुप्पट चटई क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे प्रस्तावावर निर्णय होण्यापूर्वी शासनाने तज्ञांची, ग्राहक संघटनांची मते विचारात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०४-२०१८) :** (१) शासन निर्णय दि.१६.०८.२०१० व दि.२२.०२.२०१३ हे ज्या दिवसापासून निर्गमित झालेले आहेत, त्या दिवसापासून अमलात येत असल्याने काही रहिवाश्यांकडे दि.१३.०३.१९९६ पूर्वीची कागदपत्रे असूनही असे रहिवाशी त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित राहत असल्याने असे रहिवाशी व्यथित होऊन म्हाडा व शासनाकडे एकसारखा पाठपुरावा करित आहेत. तसेच न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आहेत. याबाबी विचारात घेऊन म्हाडाने सदरचे शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदरचे शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू केल्यास अशा अपात्र रहिवाश्यांना त्याचा पूर्ण फायदा होऊन त्यांना किमान ३०० चौ.फूट चटई क्षेत्रफळ असलेल्या सदनिका प्राप्त होतील. जर योजना ही भाडेकरूंच्या पुनर्वसनासाठी लागणारा चटईक्षेत्र निर्देशांक + ५०/६०/७० टक्के इतके प्रोत्साहानात्मक चटईक्षेत्र निर्देशांकानुसार अनुज्ञेय असेल, तर त्यानुसार, ३०० फूट चटई क्षेत्रफळावरती विकासकास ५०/६०/७० टक्क्यापर्यंत प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्रफळाचा लाभ होईल.

(३) म्हाडाने सन २०१० व २०१३ मधील शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबतचा सादर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यवाही प्रलंबित असून शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या मैदानातील काम पूर्ण नसतांना कंत्राटदारास देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(१०) ८६३१३ (२३-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या मैदानाच्या कामांची नगरविकास विभागाकडून चौकशी सुरु असतांना शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून रु.१,०६,०६,५८८/- बिले अदा करण्यात आली असल्याची गंभीर बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर झालेली कामे आणि अदा केलेली बिले यामध्ये मोठी तफावत आढळून येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून यामध्ये चौकशी प्रलंबित असतांना एवढ्या मोठ्या रकमेची देयके अदा करून शासनाचे आदेश धाब्यावर बसविले जात असतांना शासनस्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१८) :** (१), (२) व (३) चौकशी प्रलंबित असतांनाही रूपये १,०६,०६,५८८/- बीले अदा करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे,

याबाबत शासन स्तरावर तपासणी सुरू असून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्याबाबत

**(११) ८६४३४ (२३-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्याने स्थापन झालेल्या पनवेल महानगरपालिकेमार्फत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्षेत्रामध्ये नियोजीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत असून बेलापूर-तळोजा ते पनवेल मेट्रो रेल्वेचे काम प्रगतीपथावर सुरू असून उरण-पनवेल कॉरिडॉर रेल्वे प्रकल्प, सेज प्रकल्प व रेल्वे टर्मिनलचेही काम सुरू असून महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत लक्षात घेता पायाभूत सुविधा पुरविणे अडचणीचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महानगरपालिकेमार्फत पायाभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने स्मार्ट सिटी योजनेत समाविष्ट करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्यातील ८ शहरांची स्मार्ट सिटी म्हणून निवड केलेली आहे. यामध्ये पनवेल महानगरपालिकेचा समावेश नाही. तथापि अमृत अभियान तसेच राज्य शासनाच्या विविध योजनांमधून पनवेल शहरामध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करणेसाठी पनवेल महानगरपालिकेस राज्य शासनामार्फत सहकार्य करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत राजगुरुनगर नगरपरिषदेतील पाणीपुरवठा योजनेबाबत

**(१२) ८८३७४ (२३-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्याच्या बळकटीकरणासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत राजगुरुनगर नगरपरिषदेने दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव उप संचालक, नगर प्रशासन संचालनालयास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजगुरुनगर नगरपरिषदेने सदर पाणीपुरवठा योजनेचे तांत्रिक मुल्यांकन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यामार्फत तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी मा.संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या पत्र क्र. नपप्रसं/नगरोत्थान/२०१४/राजगुरुनगर पापु/सं.७९६५/का.१३ दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास पत्रानुसार कळविलेल्या त्रुटी राजगुरुनगर नगरपरिषदेने पत्र क्र.२४५०/१६ दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ नुसार त्रुटींची पूर्तता केली असून सदरचा प्रस्ताव प्रशासकीय तसेच वित्तीय मान्यतेची प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राजगुरुनगर नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावाच्या मान्यतेची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर योजनेला शासन स्तरावरून मान्यतेसाठी अजून किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१८)** : (१), (२), (३) व (४) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव राजगुरुनगर नगरपरिषदेने दि.१५ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर केला.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये शासन मान्यतेसाठी सादर केला.
• त्यानुसार, रु.१५.४८ कोटींच्या राजगुरुनगर शहर पाणी पुरवठा प्रकल्पास शासन निर्णय, दि.२८ मार्च, २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**दादर (मुंबई) येथील काकासाहेब गाडगीळ मार्गावरील पुनर्विकासात विकासक मे.आकृती डेव्हलपर्स व बिल्डर्स यांनी केलेल्या रहिवाश्यांच्या फसवणुकीबाबत**

**(१३) ८८४२३ (०४-०९-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील काकासाहेब गाडगीळ मार्ग दादर (पश्चिम) मुंबई २८ येथील पुनर्विकासात विकासक मे.आकृती डेव्हलपर्स व बिल्डर्स यांना सन २००४ मध्ये वि.नि.न. ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासाकडून भाडेकरू / रहिवाश्यांना पर्यायी जागेसाठी जागा देऊन इमारत रिकामी करून घेण्यात आली होती परंतु मागील ७ ते ८ वर्षापासून पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडेही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व तदनुसार पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्याकरिता विकासकाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी वि.नि.नि. ३३(७) मधील तरतुदीनुसार दि.०५.०५.२००४ रोजीच्या पत्रान्वये मे.आकृती डेव्हलपर्स व बिल्डर्स यांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

जुन्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये एकूण (४५ निवासी + ०३ अनिवासी) ४८ भाडेकरु/ रहिवाशी रहात होते. सदर इमारत धोकादायक असल्यामुळे सन २००१ साली इमारतीचा पहिला व दुसरा मजला तोडण्यात आला. एकूण २६ निवासी भाडेकरु/रहिवाश्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरात पर्यायी जागा देण्यात आली. विकासकाने ११ व्या मजल्यापर्यंतचे काम पूर्ण करुन, ते थांबविण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सदरचे काम बंद अवस्थेत आहे. मागील काही वर्षांपासुन भाडेकरु/रहिवाश्यांचे भाडे विकासक देत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांनी काम सुरु करण्याबाबत तसेच प्रलंबित भाडे देण्याबाबत विकासकांबरोबर अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे. तसेच भाडेकरु/रहिवाशी व विकासक यांची दि.१०.०४.२०१४, दि.१८.११.२०१४ व दि.२३.०५.२०१६ रोजी संयुक्त बैठका घेतलेल्या असून,

ना-हरकत प्रमाणपत्रातील अटींचा पूर्तता न केल्यामुळे, विकासकास कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. परंतू विकासकाची आर्थिक परिस्थिती व तद्नंतर त्यांचे निधन झाल्यामुळे, पुनर्विकासाचे काम रखडले आहे, ही वस्तुस्थिती आहे. पुनर्विकासाचे उर्वरित काम विकासकाचे भागीदार यांनी दि.२३.०५.२०१६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये सुरु करण्याची हमी देऊनही, काम सुरु होऊ शकले नाही.

म्हाडाने अशाच प्रकारच्या बंद पडलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी धोरण निश्चित करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव शासनास सादर झालेला आहे. सदर प्रस्तावामध्ये ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने मालमत्ता म्हाड अधिनियम १९७६ प्रकरण ५ कलम ४१ मधील तरतूदीनुसार भूसंपादित करुन, उर्वरित काम पूर्ण करण्याची तरतूद केलेली आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहीम (मुंबई) येथील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीचा पुनर्विकास करणेबाबत**

**(१४) ८८४२४ (०४-०९-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम (मुंबई) येथील साई सदन मंगलमुर्ती, गणेश कृपा सुखशांती संजीवनी प्रसाद दत्तकृपा ई. इमारती सन १९७० ते १९८० दरम्यान पंतप्रधान अनुदान प्रल्कपांतर्गत बांधण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतींचा पुनर्विकास तांत्रिक अडचणीमुळे करणे शक्य नसल्यामुळे विशेष बाब म्हणून शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा अथवा वि. नि. मी. ३७(७) / ३३(१०) प्रमाणे स्वतंत्र योजना करून पुनर्विकास करण्याची स्थानिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०४-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत मुंबई शहरातील जुन्या २३९ उपकरप्राप्त इमारतींच्या जागी ६६ नवीन इमारती सन १९८९ ते १९९४ या कालावधीत बांधण्यात आल्या आहेत. यापैकी साई सदन इमारत सन १९९३ मध्ये व मंगलमुर्ती इमारत सन १९९१ मध्ये बांधण्यात आल्या आहेत गणेश कृपा(१९७८), सुखशांती(१९८४), संजीवनी प्रसाद(१९८५), दत्तकृपा (१९९४) या इमारती पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या नसून त्यांची पुनर्रचनाही म्हाड अधिनियम १९७६ च्या तरतुदींनुसार करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी विशेष बाब म्हणून शासनाने दि.१८.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये दरवर्षी रुपये २५ कोटी (५ वर्षांसाठी) प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पात तरतूद करून दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार या इमारतींची दुरुस्ती/ देखभाल करण्यात येत आहे. त्यामुळे या इमारती सुस्थितीत आहेत. तसेच गणेशकृपा, सुखशांती, संजीवनी प्रसाद, दत्तकृपा या इमारतींची नियमितपणे देखभाल होत असल्याने त्याही सुस्थितीत आहेत.

(३) होय, हे खरे आहे. अखिल मुंबई राजीव गांधी निवारा प्रकल्प मध्यवर्ती सहकारी गृहनिर्माण संघटनेच्या अध्यक्ष व सरचिटणीस यांनी या इमारतींची पुनर्रचना करण्याबाबत विविध स्तरावर निवेदने दिली आहेत.

(४) दि.३१.०५.२०१७ रोजी शासनाने दिलेल्या आदेशांनुसार व तदनुषंगाने प्राधिकरणाच्या दि.११.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत ठरल्यानुसार ६६ इमारतींपैकी २० इमारतींची पुनर्रचना त्यालगतच्या भूसंपादित/ उपकरप्राप्त इमारतींची वि.नि.नि.३३(९) अंतर्गत करण्याचे प्रयोजन आहे. उर्वरित ४६ इमारतींची पुनर्रचना वि.नि.नि.(९) अंतर्गत शक्य नाही. तसेच वि.नि.नि.३३(७) मध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारती व पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास करण्याची तरतूद नसल्याने या ४६ इमारतींची पुनर्रचना वि.नि.नि.३३(७) मध्ये करणे शक्य व्हावे, यासाठी वि.नि.नि. ३३(७) मध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारती व पुनर्रचित इमारतींचा अंतर्भाव करण्याची शिफारस प्रारूप विकास आराखडा २०३४ मध्ये मंडळाकडून दिनांक २८/०७/२०१६ रोजी करण्यात आली आहे. विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (७) मध्ये याप्रमाणे स्पष्ट तरतूद झाल्यानंतर या ४६ इमारतींच्या पुनर्रचनेबाबत कार्यवाही करणे शक्य होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड (पूर्व), वामनराव पै मार्ग व बाणडोंगरी येथील दिंडोशी पूला खालून यु-टर्न रस्ता बनवून वाहतूकीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) ८९९६२ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व), टाईम्स ऑफ इंडिया वामनराव पै मार्ग व बाणडोंगरी येथील नागरीकांना रेल्वे स्थानकास जाण्यासाठी दूर अंतरावरुन जावे लागत असल्याने त्यांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी टाईम्स ऑफ इंडिया जवळील दिंडोशी पूला खालून यु-टर्न रस्ता बनवून वाहतूकीसाठी उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा काढून ५० लाख निधीची तरतूद करुनही अद्याप सदरहू रस्त्याचे विकास काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेले सर्व महामार्ग एमएमआरडीए प्राधिकरणाला हस्तांतरीत केले असल्याने सदरहू रस्त्याचे काम एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे परवानगी घेवून सुरु करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उक्त मंजूर रस्त्याचे बांधकाम त्वरीत सुरु करणेबाबत एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१८) :** (१) पश्चिम द्रुतगती महामार्गावरील टाईम्स ऑफ इंडिया जवळील दिंडोशी पूलाखालून फ्री यु-टर्नचे बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०१६-२०१७ मध्ये रु.३८ लाख इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ एप्रिल, २०१७ अन्वये पश्चिम द्रुतगती मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे ५ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हस्तांतरीत करण्यात आल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रितसर निविदा प्रक्रीया पार पाडण्यात येऊन सदरचे काम पूर्ण करण्यात आले.
(२) होय.
(३) व (४) सद्य:स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदरचे काम पूर्ण झालेले असून, वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

---

**पनवेल महानगरपालिकेस नुकसान परतावा देण्याबाबत**

**(१६) ९०६३४ (२३-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एलबीटी करातील तूट लक्षात घेऊन शासनाने २५ महानगरपालिकांना नुकसान परतावा देण्याचे जाहीर केले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एलबीटी कर लादणा-या पनवेल महानगरपालिकेचे नावच या यादीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या यादीत पनवेल महानगरपालिकेचे नाव दाखल करुन एलबीटी करापोटी जमा केलेले २२ कोटी रुपये सदर महानगरपालिकेला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे, शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून ५० कोटीपेक्षा कमी आर्थिक उलाढाल असलेल्या सर्व व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट दिलेली आहे. तथापि, महानगरपालिकांना येणारी आर्थिक तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून सहाय्यक अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिकांना माहे जून, २०१७ पर्यंत सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे.

(२) ते (४) पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दि. १ जानेवारी, २०१७ पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. सबब, पनवेल महानगरपालिकेस स्थानिक संस्था करापासून उत्पन्न प्राप्त झाले आहे.

राज्यात स्थानिक संस्था कर प्रणाली रद्द होवून दिनाक ०१ जुलै, २०१७ पासून महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्याअन्वये राज्यातील महानगरपालिकांना अनुदान देण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या बाबतीत अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मनमाड शहरासाठी (जि.नाशिक) करंजवण धरण पाणी पुरवठा योजनेचे सर्व्हेक्षण करण्याबाबत**

**(१७) ९१२२८ (२३-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड शहरासाठी (जि.नाशिक) करंजवण धरण पाणी पुरवठा योजनेचे सर्व्हेक्षण करण्याबाबतचा ठराव व कराराचा मसुद्यासह मागणी मनमाड नगरपरिषद मनमाडने दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई, सचिव, नगर विकास विभाग व सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे सर्व्हेक्षण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१८) :** (१), (२) व (३) • मनमाड शहरास करंजवन धरणातून पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने सर्व्हेक्षण करुन तसा प्रस्ताव नगरपरिषदेच्या ठरावासह नगरपरिषद प्रशासन संचालनालयास एप्रिल, २०१७ मध्ये सादर केला आहे.

• तथापि, सदर प्रस्तावाबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा व तांत्रिक मान्यता अद्याप नगरपरिषद प्रशासन संचालनालयास अप्राप्त आहे.

---

**अमळनेर शहरात अतिक्रमण हटाव मोहीम स्थगितीचा नियमबाह्य ठराव केल्याबाबत**

**(१८) ९१३३२ (२३-०८-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेरचे उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी यांनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा सुमारास अतिक्रमण हटाव मोहीम, बेकायदा बांधकाम हटविण्यासाठी योजना तयार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नगराध्यक्षा यांनी दिनांक ३० मार्च व दिनांक ०८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास याबाबतचे प्रथमतः आदेश दिले असून त्यानूसार दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी पोलीस बंदोबस्त पुरविण्याची तजबीज करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वास्तविक कायद्याने व नियमाने अतिक्रमण काढण्याची मोहीम अथवा कार्यवाही थांबविण्याबाबत ठराव करण्याचा कुठलाही अधिकार स्थायी समितीस नसतांनाही दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी स्थायी समितीच्या सभेत ही मोहीम स्थगित करण्यासाठी बेकायदेशीरपणे ठराव क्र.५७, विषय क्र.५६ घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अतिक्रमण हटविणे, मोहीम राबविणे प्रशासकीय बाब असून मोहीमे विरुध्द ठराव अथवा हस्तक्षेप करण्याचा अधिकार नगरपरिषद सदस्यांना नसतांनाही अमळनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा व त्यांचे सहकारी २२ नगरसेवक यांनी अधिकाराचा गैरवापर करुन महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ (ई) चा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी कायद्याचे उल्लघंन केल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधी, आघाडीचे गटनेते प्रविण पाठक व इतर यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१८) :** (१) होय.
(२) पोलीस निरिक्षक, अमळनेर पोलीस स्टेशन यांनी दिनांक १७.०४.२०१७ रोजी अमळनेर नगरपलिका हद्दीतील अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येईल, असे मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद यांना कळविले होते.
(३) अमळनेर नगरपरिषदेच्या स्थायी समितीने ठराव क्र. ५७ अन्वये स्थगिती दिली आहे, हे खरे आहे.
(४), (५) व (६) श्री.प्रविणकुमार पाठक व इतर, अमळनेर यांनी अमळनेर नगरपरिषदेच्या दिनांक ११.०४.२०१७ ठराव क्र. ५७, विषय क्र. ५६ बाबत नगराध्यक्षा व इतर २२ नगरसेवक यांचे विरुध्द महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ (१) ई अन्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे अर्ज दाखल केला.

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सुनावणीअंती दिनांक २९.०१.२०१८ च्या आदेशान्वये नगराध्यक्षा व इतर २२ नगरसेवक यांना आदेशाचे दिनांकापासून उर्वरित पदावधीसाठी अनर्ह ठरविले आहे.

---

**म्हाडाने मालवणी, मालाड (मुंबई) येथे सन २०१५ मध्ये आर्थिक कमकुवत घटकांसाठी काढलेल्या लॉटरी विजेत्यांना घरांचा ताबा मिळण्याबाबत**

**(१९) ९४९७५ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने मालवणी, मालाड (मुंबई) येथे सन २०१५ मध्ये आर्थिक उत्पन्न कमी असलेल्या घटकांसाठी लॉटरी काढली असून यामध्ये सुमारे १७० कुटुंबांना घरांची लॉटरी लागली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरांची किंमत १८ लाख ६५ हजार असून लॉटरी विजेत्यांनी कर्जे काढून म्हाडामध्ये ही रक्कम भरून दोन वर्षे झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लॉटरी विजेत्यांचे कमी उत्पन्न असून त्यांच्या पगारातून कर्जाचे हप्ते कापले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कुटुंबांना घरांचा ताबा केव्हा मिळणार आहे व याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०४-२०१८) :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई मंडळाने सन मे-२०१५ च्या सोडतीत इमारतीचे बांधकाम सुरु असलेल्या मालवणी मालाड येथील एकूण २३२ अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांची सोडती मार्फत विक्रीची जाहिरात प्रसिध्द केली. यापैकी एकूण २२४ यशस्वी लाभार्थी होते.
(२) हे खरे आहे.

सदरहू योजनेतील सदनिकाची विक्री किंमत रु.१८,६२,६३९/- इतकी असून सोडतीतील यशस्वी लाभार्थ्यांपैकी काहींनी बँकेचे कर्ज काढून सदनिकेची विक्री किंमत ऑगस्ट २०१६ पासून मंडळास भरणा केलेली आहे.
(३) शासन धोरणानुसार आर्थिक दुर्बल उत्पन्न गटाकरीता निश्चित करण्यात आलेल्या या उत्पन्न गटाकरीताच्या मर्यादेनुसार मुंबई मंडळाने सन २०१५ चा सोडतीमार्फत २३२ सदनिका या आर्थिक दुर्बल उत्पन्न गटाकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या. या आर्थिक दुर्बल उत्पन्न गटात मोडणारे सोडतीतील यशस्वी लाभार्थ्यास बँकेने कर्ज मंजूरीकरीता पात्र करुन सदनिकेच्या विक्री किंमतीपोटी भरावयाच्या रकमेस कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे.

या आर्थिक दुर्बल उत्पन्न गटाच्या प्रवर्गातील सदनिकेच्या विक्री किंमतीपोटी सोडतीतील यशस्वी ज्या अर्जदारांनी बँकेचे कर्ज घेतले आहे, त्यांचे कर्जाचे हप्ते कापले जात आहेत.
(४) गोरेगाव विभागाने ०१.०९.२०१७ रोजी व दि. १२.१०.२०१७ रोजी दोन्ही इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे कळविल्यानुसार सदनिकेची ताबा वितरण प्रक्रिया हाती घेऊन अद्यापपर्यंत १४९ सदनिकेचा ताबापत्राचे वितरण करण्यात आलेपैकी १४५ लाभार्थ्यांनी सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. उर्वरीत सदनिकांच्या वितरणांची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

यशस्वी लाभार्थ्यांनी भोगवटा प्रमाणपत्राअभावी ताबा मिळाला नसताना विलंबाने भरलेल्या सदनिकेच्या विक्री रकमेवर वसुल करण्यात आलेले व्याज परतावा करणेबाबत मागणी केली असता सदर विषयी दोन्ही इमारती क्र. १ व २ यांना भोगवटा प्रमाणपत्र

मिळणेपूर्वी विलंब रकमेवर व्याज आकारण्यात आले आहे, त्यांना व्याजाची रक्कम परत करावी. अशा प्रस्तावास उपाध्यक्ष, म्हाडा यांनी दि. ०२.११.२०१७ रोजी मान्यता दिली असून संबंधित लाभार्थ्यांचे व्याज परतावा करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून येत्या कालावधीत भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याआधीकरीता वसुल करण्यात आलेल्या विलंब व्याज परतावा मंडळाकडून देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील प्रकाश कॉटन मिल, हिंदुस्थान मिल, मधुसूदन मिल आणि क्राऊन मिलमधील कामगारांसाठी कट ऑफ डेट निश्चित करण्याबाबत**

**(२०) ९५०४१ (३०-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रकाश कॉटन मिल, हिंदुस्थान मिल, मधुसूदन मिल आणि क्राऊन मिलमधील कामगार तत्कालीन संपात सामील झाल्याने शासनाच्या कट ऑफ डेट मध्ये पात्र होत नसून या कामगारांसाठी दिनांक ०१ ऑक्टोबर, १९८१ ही कट ऑफ डेट ठेवून त्यांना पात्र ठरविण्यात यावे अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी आणि गिरणी कामगारांनी माहे ऑगस्ट, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने उपरोक्त गिरणीतील कामगारांसाठी दिनांक ०१ ऑक्टोबर, १९८१ ही कट ऑफ डेट निश्चित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०३-२०१८) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार गिरणी कामगार कृती संघटना यांनी दि. ३०.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये "२९-ब्रॅडबरी मिल ही गिरणी सन १९८० साली बंद झाली. त्यामुळे या गिरणीमधील गिरणी कामगारांना घरे देतांना १ जानेवारी १९८० ही कट ऑफ डेट मानावी. तसेच ४८ प्रकाश कॉटन मिल, ५२-श्रीनिवास मिल, १८-मधुसुदन मिल, हिंदुस्थान ए/बी मिल, क्रॉऊन मिल, हिंदुस्थान प्रोसेस, स्टॅन्डर्ड मिल शिवडी, स्टॅन्डर्ड मिल प्रभादेवी, सिताराम मिल, इत्यादी गिरण्यांचे कामगार आधी संपावर गेल्याने त्यांच्यासाठी दि. ०१.१०.१९८१ ही कट ऑफ तारीख मानावी." अशी मागणी केलेली आहे.
(२) सदरहू मागणीच्या अनुषंगाने म्हाडाने पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबई ऐरोली परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उन्नत मार्ग बांधण्याबाबत

**(२१) ९५१२५ (३०-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोलीहून मुंबई व नवी मुंबईकडे दररोज हजारो वाहने ये-जा करीत असतात त्यामुळे ऐरोली, माईनस्पेस आय.टी.पार्क, भारत बिजली या परिसरात प्रचंड वाहतुकीची कोंडी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुकीची कोंडी दूर होण्यासाठी सदरच्या ठिकाणी उन्नत मार्ग बांधण्यात यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उन्नत मार्गासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत व उन्नत मार्गाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधिन ठिकाणी वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी मा. लोकप्रतिनिधींकडून उन्नत मार्ग बांधण्याबाबत मागणी होत आहे. तथापि, सदरचे काम ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रांतर्गत येत आहे. महापालिका क्षेत्रांतर्गत रस्ते / पुलाची कामे करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची असल्याने सदर काम ठाणे महानगरपालिकेमार्फत होणे अपेक्षित आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विस्तारित मुंबई पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधांची कामे विशेषत: रस्ते व पुलाची कामे हाती घेण्यात येतात. त्यानुषंगाने ठाणे-बेलापूर रस्त्यावर घणसोली तडवळी उड्डाणपुल, सविता केमिकल्स जंक्शनजवळ उड्डाणपुल, महापे जंक्शनजवळ वाहनांकरीता भूयारी मार्ग इ. कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आली असुन सदर कामे पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आहेत.

---

### मुंबई शहरातील वाढते रेल्वे अपघात कमी करण्याबाबत

**(२२) ९५३३७ (०१-०१-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची लाईफलाईन समजली जाणाऱ्या रेल्वे प्रवासादरम्यान मागील १० महिन्यात अडीच हजार प्रवाशांचा रेल्वे अपघातामुळे मृत्यू झाला असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसेंदिवस वाढते रेल्वे अपघात कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सन २०१५-१६ मध्ये अति रेल्वे अपघात होणाऱ्या ठिकाणांची माहिती संकलित करुन ती ठिकाणे व अपघात कमी केले जाण्यासाठी उपाययोजना असा अहवाल शासन व रेल्वे प्रशासनास मुंबई रेल्वे पोलीसांकडून सादर करण्यात आला आहे. मुंबई रेल्वे पोलीसांनी सन २०१७ मध्ये रेल्वे कार्यक्षेत्रातील सर्व रेल्वे स्थानक परिसराची संपूर्ण पाहणी करुन स्थानक परिसरातील अनधिकृत प्रवेशमार्ग तसेच पटरी ओलांडण्याची ठिकाणे निश्चित करुन ते बंद करण्याकामी प्रयत्न करण्यात येत आहेत. माहे जानेवारी २०१७ मध्ये २३८ इतके अनधिकृत प्रवेशद्वार होते व माहे जानेवारी, २०१८ मध्ये ते १३९ इतके राहिले आहेत. रेल्वे ट्रॅक क्रॉस करण्याच्या काही ठिकाणी कॉन्सरटीना कॉईल लावण्यात आल्या आहेत. एम इंडिकेटर ॲपद्वारे व्हिडीओ क्लिप्स प्रसारण, शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी, प्रवासी संघटना यांच्यात सुरक्षित प्रवासाबाबत जनजागृती केली जात आहे. रेल्वे अपघात कमी होण्यासंदर्भात जनहित याचिका ५०/२००८ मा.मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

मध्य रेल्वेमार्फत सन २०१६ ते आजपावेतो २३ रेल्वेवरील पादचारी पुल बांधण्यात आले असून २४ रेल्वेवरील पादचारी पुलाचे काम प्रगतीपथावर असून आणखी ३४ पादचारी पुल प्रस्तावित आहेत, अस्तित्वात असलेल्या ०४ पादचारी पुलांच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाले असून १० पादचारी पुलाच्या विस्तारीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे, ७४ सरकते जिने सुरु करण्यास मान्यता मिळाली असून १४९ सरकते जिने सुरु करण्याची कार्यवाही मध्य रेल्वेमार्फत सुरु आहे. तसेच मुंबई उपनगरीय स्थानकांसाठी ३८ लिफ्टला मान्यता मिळाली आहे. मध्य रेल्वेने २७३ प्लॅटफॉर्मची लांबी वाढविण्याचे निश्चित केले आहे. त्यापैकी १८८ प्लॅटफॉर्मचे काम पूर्ण झाले असून ८५ प्लॅटफॉर्मचे काम प्रगतीपथावर आहे. रेल्वे रुळ ओलांडणे व रेल्वे डब्यांवरुन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांविरुध्द दंडात्मक कार्यवाही मध्य रेल्वेमार्फत सातत्याने करण्यात येत आहे. सन २०१७ मध्ये ९८३५ प्रकरणे नोंदविण्यात आली असून रु.२१५९५७८/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. १६७ गुन्हेगारांना गजाआड करण्यात आले आहे. १० रेल्वे स्थानकांमध्ये आपत्कालीन वैद्यकिय खोल्या सुरु आहेत शिवाय १६ रेल्वे स्थानकांवर आपत्कालीन खोल्या सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. राज्यशासनाच्या सहकार्याने २२ स्थानकांमध्ये ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय आणखी ३० स्थानकांसाठी ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्याबाबत मध्य रेल्वेमार्फत शासनास विनंती करण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वेमार्फत वाढते रेल्वे अपघात कमी करण्याच्या अनुषंगाने रेल्वे प्लॅटफार्मची उंची वाढविणे, डोअर क्लोजर सिस्टममध्ये सुधारणेसाठी निविदा मागविणे, वाढत्या गर्दीवर उपाय म्हणून कार्यालयीन वेळेत बदल करणे, सिग्नल यंत्रणेत सुधारणा करणे तसेच १५ डब्याच्या उपनगरीय रेल्वे गाडया सुरु करणे, चर्चगेट ते विरारसाठी दिर्घकालीन उपाय म्हणून

कम्युनिकेशन बेस ट्रेन कन्ट्रोल (CBTC) प्रणालीच्या सिग्नलींगची व्यवस्था प्रस्तावित केली आहे, अशा प्रकारे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

---

## अकोला तहसील कार्यालयासमोरील महानगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील एका दुकानात विषारी अमोनिया वायूची गळती झाल्याबाबत

**(२३) ९५३८४ (३०-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला तहसील कार्यालयासमोरील महानगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील एका ऑफसेटच्या दुकानात विषारी अमोनिया वायूची गळती झाल्याची घटना माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यानच्या शेवटच्या आठवड्यात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वायू गळतीमुळे नागरिकांना डोळ्यांचे विकार, अंधुक दिसण्यासारखे प्रकार, काहींच्या अंगावर सूज आदी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यसाय, विषारी वायूचा व्यवसायात उपयोग करण्यात येणाऱ्या उद्योग समूहांना शहरी बाजार पेठ तसेच रहिवासी वस्तीमध्ये व्यवसाय करणे अथवा न करणेबाबत शासनाच्या काही मार्गदर्शक सूचना आहेत काय,

(४) असल्यास, सूचना काय आहेत व त्याची अंमलबजवणी करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, त्याची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) यासाठी, पर्यावरण विभागातंर्गत, उद्योगांना जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ व हवा (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ तसेच घातक घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ व पर्यावरण कायदा, १९८६ हे कायदे अस्तित्वात असून, त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण मंडळाकडून केली जाते.

---

## मुंबई येथील वरळी बी.डी.डी.चाळींच्या पुनर्बांधणीबाबत

**(२४) ९५४०४ (३०-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वरळी बी.डी.डी.चाळींच्या पुनर्बांधणीकरीता दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत किती बांधकाम क्षेत्रातील कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे,

(२) असल्यास, शिवडी येथील बी.पी.टी.च्या जागेवर असलेल्या या बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने बी.पी.टी.ची जमीन पुनर्विकास प्रकल्पासाठी मिळावी यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे काय वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, वरळी बी.डी.डी.चाळीच्या निविदा भरलेल्या कंपनीपैकी किती परदेशी कंपन्यांनी निविदा भरल्या आहेत व कोणत्या विकासकाला मान्यता देण्यात आली आहे,
(४) असल्यास, पहिल्या टप्प्यात वरळी येथील ५२ एकर जागेवर उभ्या असलेल्या चाळीतील रहिवाश्यांना किती चौ.फूटांच्या सदनिका देण्यात येणार आहेत,
(५) असल्यास, रहिवाश्यांना देण्यात येणाऱ्या सदनिका असलेल्या इमारती किती मजली असणार आहेत,
(६) अद्याप वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी.चाळींच्या निविदांबाबत अंतिम निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०३-२०१८) :** (१) वरळी बीडीडी चाळीच्या पुनर्विकासासाठी मागविण्यात आलेल्या जागतिक निविदा प्रकरणी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख २७.०७.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती व कालावधीत तीन (३) निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत.
(२) शिवडी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत सुसाध्यता (Feasibility Report) अहवाल म्हाडाने दि.१६.०२.२०१८ रोजी मुंबई बंदर न्यासास (Mumbai BPT) पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे.
(३) वरळी बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत तिन्ही निविदेत निविदाकारांमध्ये परदेशी कंपन्यांचा समावेश आहे. निविदा स्विकृती कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पासाठी बांधकाम ठेकेदार निविदा स्विकृतीनंतर निश्चित होईल.
(४) वरळी बीडीडी चाळीतील पात्र भाडेकरुंना विकास नियंत्रण नियमावली ३३(९) (ब) मधील तरतुदीनुसार ५०० चौ. फु. चटई क्षेत्रफळाची पुनर्विकास सदनिका विनामूल्य व मालकी तत्वावर वितरीत करण्यात येईल.
(५) प्रस्तावित पुनर्वसन सदनिका असलेल्या इमारती २३ मजल्यापर्यंत असतील.
(६) ना.म.जोशी मार्ग व नायगांव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी बांधकाम ठेकेदाराची नियुक्ती दि.२१.०४.२०१७ रोजीच्या कार्यादेशान्वये (work order) करण्यात आलेली आहे. वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत शापूरजी पालनजी अॅण्ड कं. प्रा.लि. व इतर यांनी तांत्रिक कारणास्तव निविदा सादर करण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.२०७०/२०१७ दाखल केली होती व त्यांची विनंती मा.न्यायालयाने मान्य केली होती. मा.उच्च न्यायालयाच्या सदरहू आदेशाविरुध्द म्हाडाकडून मा. सर्वोच्च न्यायालयात SLP No.२८५७०-२०१७ अन्वये दावा दाखल करण्यात आला व सदर बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १२.०२.२०१८ रोजी, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २८.०९.२०१७ रोजी दिलेले आदेश रद्दबातल केले व तद्नंतर पुढील निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

---

**बुलडाणा (जि.बुलडाणा) शहरातील नाटयगृहाचे बांधकाम १५ वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ९६४२० (०२-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा शहरातील मागील १५ वर्षापासुन मंजुर असलेले नाटयगृहाचे बांधकाम प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाटयगृह बांधकामच्या अंदाजपत्रकात आवश्यक असलेल्या अनेक कामांचा समावेश नसल्याने तसेच नाटयगृह बांधकामाचा निधी इतरत्र वापरल्याने सदर नाटयगृहाचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार आवश्यक निधी मंजूर करुन बांधकाम त्वरीत पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१८) :** (१) होय.

(२) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२७.०८.२००२ च्या शासन निर्णयान्वये बुलढाणा येथील नाट्यगृहाच्या बांधकामासाठी रू.३,११,४४,३००/- एवढ्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या नियमानुसार एकूण आवश्यक निधीपैंकी ७५ टक्के निधी शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने तर २५ टक्के निधी नगरपरिषदेने उपलब्ध करून द्यावयाचा होता. सांस्कृतिक कार्य विभागाने रू. २ कोटी एवढा निधी आतापर्यंत उपलब्ध करून दिला असून नगरपरिषदेने त्यांच्या हिश्याचा रू.७५ लाख एवढा निधी उपलब्ध करून दिला आहे.

सदर नाट्यगृहाचे बांधकाम ६०% पेक्षा जास्त झाले असून कंत्राटदाराने काम अपूर्ण ठेवणे तसेच योजनेमध्ये परिस्थितीनुरूप प्रचलित व नाविण्यपूर्ण घटकांचा समावेशन करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे व वास्तुविशारद यांच्या सल्ल्यानुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मान्यतेकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

सदर योजनेतील रू. ३०.०० लक्ष इतका निधी आस्थापना खर्चासाठी तात्पुरत्या स्वरूपात वळती करण्यात आला होता. तथापि, सदर वळती केलेला निधी योजनेच्या बँक खात्यात पुन्हा जमा करण्यात आला आहे.

(३) दि.२७.०३.२००८ च्या सर्वसाधारण सभेत श्री. जे. व्ही. कुलकर्णी ॲन्ड फ्रेंड्स असोसिएट्स, मलकापूर या कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याचा ठराव मंजूर होऊन त्यानुसार कार्यारंभ आदेश दि.२९.०३.२००८ रोजी देण्यात आला. सदर निविदा रू.२०७.८५ लक्ष एवढ्या किंमतीची होती. कंत्राटदाराने १२ महिन्यात सदर काम पूर्ण करणे आवश्यक होते.

नगरपरिषदेने दि.३१.१०.२०१६ पर्यंत वेळोवेळी कंत्राटदाराच्या विनंतीस अनुसरून काम पूर्ण करण्यास मुदतवाढ दिली. तथापि, त्यानंतरही कंत्राटदाराने काम पूर्ण न केल्याने मुदतवाढ न देता सदर कंत्राट रद्द करण्याचा निर्णय दि.१०.०३.२०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.

कंत्राट रद्द करतानाच नगरपरिषदेने, प्रकल्प व्यवस्थापकाने सदर नाट्यगृह अत्याधुनिक होण्याच्या दृष्टिने सुचविलेल्या १२ अतिरिक्त कामाच्या बाबींनाही मंजुरी दिली आणि सुधारित प्रकल्प किंमतीनुसार नगरपरिषदेने रू. ४.२३ कोटी एवढ्या रक्कमेचे नविन अंदाजपत्रक तयार केले असून तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे दि.२०.०२.२०१८ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने विकासक मे. क्षितीजा इन्फ्रास्ट्रक्चर यांना म्हाडाचे भाडे थकविल्याने काम बंद करण्याची नोटीस बजावल्याबाबत**

**(२६) ९६५९० (३०-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा विभाग, ना.म.जोशी मार्ग सर्व्हे नं. १९४४, १/१९४४ ते ५/१९४४ येथील लक्ष्मी बिल्डींगचा पुनर्विकास करताना विकासकाने जुने भाडेकरुंच्या इमारतीत १०४ वाढीव सदनिका बांधल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने भाडेकरुंना ठेवलेल्या ट्रान्झीट कॅम्प २ सी.पी.एम.जी. कॉलनी धारावी येथील इमारतीचे भाडेही म्हाडाला अदा केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाने विकासक मे. क्षितीजा इन्फ्रास्ट्रक्चर यांना भाडे थकविल्याने काम बंद करण्याची नोटीसही बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०४-२०१८) :** (१) विकासक मे. क्षितीजा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., यांनी जुन्या उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरु/ रहिवाश्यांच्या पुनर्वसनार्थ ए, ए-१, बी, बी-१, सी, सी-१, डी आणि इ या विंग बांधलेल्या आहेत. याबाबत विकासकाने सदर पुनर्वसनार्थ बांधलेल्या इमारतीमध्ये अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन करुन वाढीव बांधकाम केल्याच्या तक्रारी प्राधिकरणाचे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, यांच्याकडे प्राप्त झाल्यामुळे, याप्रकरणी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार, प्राधिकरण यांच्यामार्फत चौकशी करण्याच्या सुचना म्हाडाच्या स्तरावरुन देण्यात आल्या होत्या. त्याबाबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार,

प्राधिकरण यांनी अंतरीम अहवाल सादर केला असून, त्याअनुषंगाने मंडळाने उपमुख्य अभियंता/परिमंडळ-३, दुवपु मंडळ यांना त्यांच्या परिमंडळातील कार्यकारी अभियंता, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार यांच्या कार्यालयातील ०१ प्रतिनिधी व कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव, (शहर), मनपा यांची समिती नेमुन, त्यांच्यामार्फत विकासकाने पुर्नविकसीत केलेल्या इमारतीत चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन, भाडेकरु/रहिवाश्यांचे थकीत भाडे, कॉपर्स फंड इत्यादी बाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्यास आदेशित केले आहे. सदर चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

विकासकाने वितरीत केलेल्या संक्रमण शिबिरातील गाळ्यापोटी देय असलेल्या थकबाकीपैकी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रु.३.०६ करोड इतक्या रक्कमेचा भरणा विकासकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे केला असून विकासकाकडे रु.४४,७७,३५८/- एवढी रक्कम थकीत आहे.

(३) हे खरे आहे.

विकासक मे.क्षितीजा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी त्यांना वितरीत केलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयांपोटी मे २०१७ अखेर रुपये ३,१५,७९,०५५/- इतक्या रक्कमेची थकबाकी न भरल्याने, त्यांना दि.२५.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये काम बंद करण्याची नोटीस (Stop Work Notice) बजाविलेली आहे.

(४) विकासकाने दि.३१.०८.२०१७ पर्यंत रुपये ३.०६ करोड इतक्या रक्कमेचा भरणा उपमुख्य अधिकारी (संक्रमण शिबीर), दुवपु मंडळ यांच्याकडे केलेला आहे. तथापि, सदर गाळयांपोटी नोव्हेंबर २०१७ पर्यंत रुपये ४४,७७,३५८/- इतकी रक्कम देय असून, त्यांचा भरणा अद्यापही विकासकाने केलेला नाही. त्यामुळे मंडळाने त्यांना दि.२५.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली काम बंद करण्याची नोटीस (Stop Work Notice) उठविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडीसह डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ इत्यादी राज्यातील अनेक महानगरपालिकेत स्वच्छता अभियान असफल झाल्याबाबत

**(२७) ९६६२६ (३०-१२-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भिवंडीसह डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ इत्यादी राज्यातील अनेक महानगरपालिकांत केंद्र शासनाच्या स्वच्छता अभियान असफल झाल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शहरातील महानगरपालिका विभागात साथीचे आजार फैलावू नयेत यासाठी औषध फवारणीकडे दुर्लक्ष होत आहे तसेच घंटागाडयाही फिरकत नसणे, स्वच्छता

मोहिम राबविण्याकरिता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुनही शहरे गलिच्छ बनली असल्याने नागरिकांचे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१८) :** (१) राज्याच्या नागरी भागात स्वच्छ भारत अभियान असफल झाल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले नाही.

(२) • राज्यातील शहरांमध्ये साथीच्या आजारांचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत नियमितपणे औषधांची फवारणी करण्यात येत आहे.

• देशातील सर्व शहरे स्वच्छ करण्यासाठी “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” राबविण्यात येत आहे. या अभियानातंर्गत राज्याचा नागरी भाग १ ऑक्टोंबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला आहे.

• राज्यातील शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे, निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source segregation) करण्यासाठी “कचरा लाख मोलाचा” हीमोहिम १ मे, २०१७ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

• घनकचरा व्यवस्थापनातंर्गत राज्यातील सर्व शहरांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिकेच्यावतीने शहरात पाणीपुरवठा योजनेतंर्गत नवीन पाईपलाईनाला जोडणी देण्याबाबत

**(२८) ९६९७२ (०१-०१-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिकेच्यावतीने शहरात पाणीपुरवठा योजनेतंर्गत नवीन पाईप लाईनाला जोडणी देण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे पावती भरुनही नागरिकांना नळजोडणी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधीत कंत्राटदारावर कारवाई करुन नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करुन येथील नागरीकांना तातडीने नळजोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिकेच्यावतीने शहरात पाणीपुरवठा योजनेतंर्गत नवीन पाईप लाईनाला जोडणी देण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली नाही. तथापि, परवानाधारक प्लंबरला नळ जोडणीसाठी ठरवून दिलेल्या दरानुसार खोदकाम व नळजोडणी साहित्य इत्यादीबाबतचे शुल्क घेवून लाभार्थ्यांना नळजोडणी करुन देण्याच्या सूचना कळमनुरी (जि.हिंगोली) नगरपालिकेमार्फत देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

कळमनुरी नगरपरिषदेने यापूर्वी व चालू वर्षामध्ये असे एकूण ३६८४ लाभार्थ्यांना पावती भरुन नळ जोडणी करुन देण्यात आली असून, त्यात कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

(३) नगरपरिषदेच्या आस्थापनेवर नविन नळजोडणी करण्याकरीता प्लंबरची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत प्रगती पथावर असल्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती शहरास सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत

**(२९) ९७२१२ (३०-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात अप्पर वर्धा धरणात मुकलब पाणी असूनसुध्दा जीवन प्राधिकरणाच्या नियोजनाअभावी शहरात पाणी कपात करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचे विस्तारीत पाणी पुरवठयाचे नियोजन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत दोषी असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली तसेच अमरावतीत पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१८) :** (१) • अमरावती शहरासाठी वर्धा धरण स्त्रोत्रातून अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना सन १९९४ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे.

• सदर योजनेचे संकल्पन २०१६ ची अमरावती शहराची लोकसंख्या व १२० लिटर प्रतिमाणसी पाणी पुरवठा अशी करण्यात आली होती.

• तथापि, अमरावती शहराची वाढलेली लोकसंख्या, शहराची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊ अस्तित्वातील पाणी पुरवठा व्यवस्थेव्दारे नियमित व योग्य दाबाने व्हावा यासाठी एक दिवस आड पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केला आहे.

(२), (३) व (४) • अमरावती शहराची वाढलेल्या लोकसंख्येस १३५ लिटर प्रतिमाणसी पाणी पुरवठा करणे व शहराची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत जून, २०१६ मध्ये रु.११४.९४ कोटी किमंतीचा पाणी पुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.

• सदर प्रकल्पात ६१.०० द.ल.ली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र, ११ पाण्याच्या टाक्या, नवीन पंपीग स्टेशन, जुन्या पाईप लाईन बदलणे व नवीन भागाकरीता वाढीव वितरण पाईप लाईन टाकणे या कामांचा समावेश आहे.

• प्रस्तुत प्रकल्प ऑक्टोबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण अमरावती शहरास नियमित, वेळेत व पुरेश्या दाबाने पाणी पुरवठा होईल असा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केला आहे.

---

**म्हाडाची दुकाने विक्रीअभावी पडून असल्याबाबत**

**(३०) ९७३३१ (३०-१२-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने विविध प्रकल्पांमध्ये दुकाने राखीव ठेवली असून मुंबईतील मंडळाची गोरेगाव, मालवणी, पवई, विरार, बोळींज, प्रतिक्षानगर आदी ठिकाणी सुमारे ३०० दुकाने आणि कोकण मंडळाची १२५ दुकाने तयार असून त्यांची सोडत विविध कारणांमुळे अडकली असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई मंडळाने सन २०१० मध्ये दुकानांच्या विक्रीसाठी जाहिरात काढली परंतु त्यानंतर आजपर्यंत दुकानांच्या विक्रीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुकाने ही विक्रीअभावी पडून असून याबाबत म्हाडाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या अहवालानुसार, मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत जसे सायन, माझगांव, कुर्ला, मानखुर्द, मुलुंड, जोगेश्वरी, मालाड, गोरेगांव, कांदीवली येथे एकूण २१३ दुकाने बांधण्यात आली आहेत. यापैकी १०८ दुकानांना भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दुकानी गाळ्यांची विक्री ई-लिलावामार्फत करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तथापि, कोकण मंडळांतर्गत विरार बोळींज प्रकल्पामध्ये एकूण ५७ दुकाने बांधण्यात आली आहेत व वेंगुर्ला येथील प्रकल्पामध्ये एकूण २० दुकाने बांधण्यात येत आहेत. या दुकानी गाळ्यांची विक्रींकरीता निविदांची प्रक्रिया कोकण मंडळातर्फे प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई मंडळाच्या सन २०१० च्या दुकानांच्या विक्रीनिविदाच्या जाहिरातीनंतर मुंबई मंडळाच्या विविध वसाहतीत बांधण्यात आलेल्या एकूण २१३ दुकानी गाळ्यांपैकी भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त १०८ दुकानांची विक्री करावयाच्या तारखेपर्यंत विक्री किंमत व्याजाचे भांडवलीकरण करण्यात येवून सदर दुकानांची विक्री किंमत सुधारित करण्यात आलेली आहे. तसेच ई-लिलावामार्फत विक्री करावयाच्या दुकांनी गाळ्यांची विक्री करणेचे प्रस्तावित असल्याने मंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही.

(३) मुंबई मंडळाने बांधलेल्या भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त एकूण १०८ दुकानांची ई लिलावामार्फत विक्री करणेची कार्यवाही प्रगतीपथावर असून येत्या कालावधीत सदरची जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तथापि, कोकण मंडळाच्या विरार बोळीज दुकानांची विक्री करणेची प्रक्रिया चालु असून वेंगुर्ला योजनेतील इमारतींचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यावर दुकांनाच्या विक्री प्रक्रिया कोकण मंडळाव्दारे करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बांगूर नगर (गोरेगाव पश्चिम) येथील इनऑर्बिट मॉलजवळच म्हाडाच्या १५ एकराच्या जागेवर अत्यल्प गटातील लोकांना परवडणारी घरे बांधण्याबाबत**

**(३१) ९८११५ (३०-१२-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांगूर नगर (गोरेगाव पश्चिम) येथील इनऑर्बिट मॉलजवळच म्हाडाच्या १५ एकराच्या जागेवर सुमारे ४ हजार घरे बांधण्यात येणार असल्याच्या योजनेकडे म्हाडाचे दुर्लक्ष होत असल्याची बाब दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकरांकडून परवडणा-या घरांची मागणी मोठया संख्येने होत असून इतकी मोठी जागा उपलब्ध असताना या ठिकाणी अत्यल्प गटासाठी काही घरे बांधण्यास म्हाडा दुर्लक्ष करित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जागेत अत्यल्प गटातील लोकांना परवडणारी घरे म्हाडा बांधणार आहे काय, तसेच त्यासाठी म्हाडाने निविदा काढल्या आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०३-२०१८) :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक १७.०५.२०१६ रोजी गोरेगाव पोलिस व सशस्त्र पोलिस नायगाव यांचे संरक्षणाखाली विषयांकित जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले व

दि. १८.०५.२०१६ पासून भूखंडाच्या सभोवताली संरक्षक भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यात आले असून सर्वसामान्यांना परवडणारी विविध उत्पन्न गटांसाठी घरे बांधण्यासाठी दि. २७.११.२०१७ रोजी निविदा मागविण्यात आली आहे असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेत शिक्षण समितीचे गठण करण्याबाबत**

**(३२) ९८३४४ (०१-०१-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेत शिक्षण समितीचे गठण न केल्यामुळे महानगरपालिकेच्या शाळा नियंत्रणहिन बनल्या असून आवश्यक निर्णयाअभावी या शाळांमधील शैक्षणिक दर्जा अधिकच खालावला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण मंडळाच्या स्थापनेसाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनाकडे पाठविला असून तो अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू झाल्यापासून शिक्षण मंडळे बरखास्त झाली असल्याने, महासभेव्दारे शिक्षण समितीची निवड केली जाते. समितीस प्रशासकीय व आर्थिक अधिकार नसल्याने शाळेच्या व विद्यार्थी लाभाच्या योजना महानगरपालिकेच्या भांडार विभाग व लेखा विभागामार्फत राबविण्यात येतात.
(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१-अ, तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम ३(२)(ख) मधील तरतुदी विचारात घेऊन महानगरपालिकेस शिक्षण समिती स्थापन करता येईल.
महासभा ठराव क्रमांक ६१, दिनांक २६/०५/२०१७ अन्वये, शिक्षण समिती ऐवजी शिक्षण मंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असली तरी, सदर ठरावानुसार शिक्षण मंडळास पुर्वी असलेले अधिकार प्राप्त होत नाहीत. सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेने शिक्षण समिती स्थापन करणे अभिप्रेत असल्याने, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**क्रांतीवीर लहूजी साळवे यांचे स्मारक पुण्यात उभारण्याबाबत**

**(३३) ९९०९६ (३०-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीवीर लहूजी साळवे यांचे स्मारक पुण्यात उभारण्यात यावे यासाठी क्रांतीवीर लहूजी साळवे स्मारक समीतीच्या वतीने दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कायर्लय, पुणे वर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेने क्रांतीवीर लहूजी साळवे यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी संगमवाडी येथे सन २०१४ मध्ये साडेपाच एकर जागेवर आरक्षण टाकले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाला या जागेसाठी १६ कोटी ५० लक्ष रूपये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादन अधिकाऱ्यांनी भूसंपादनाची कार्यवाही वेळेत पूर्ण न केल्याने सदरील जागा न्यायालयाने जागा मालकाला दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, क्रांतीवीर लहूजी साळवे यांचे पुण्यामधील स्मारक होण्यासाठी जागा देण्याबाबत पुणे महानगरपालिकेने व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) क्रांतीवीर लहूजी साळवे यांच्या स्मारकासाठी संगमवाडी स.नं. ५४ येथील मान्य विकास आराखडा सन २०१७ नुसार MU & AG-२ हे आरक्षण असुन गॅझेटनुसार त्याचे क्षेत्र १४९३० चौ.मी. आहे.

दि. २८/११/२०१४ रोजी विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांचे मार्फत निवाडा जाहिर करण्यात आला असून एकूण नुकसान भरपाई रु. १६,४६,९०,४४१/- एवढी रक्कम विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६ यांचेकडे जमा करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयातील दावा क्र. ६२७७/२०१३ या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार निवाडा व्यपगत झाल्याचे निर्णय दिला असून विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१६, पुणे यांच्याकडून मुदतीत निवाडा जाहिर होऊ न शकल्यामुळे सदरचे भूसंपादन प्रकरण रद्द झाले आहे.

(५) व (६) जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा यांचेकडे दि. ०४/१०/२०१० रोजी भूसंपादन प्रस्ताव दाखल करण्यात येऊन दि. २८/११/२०१४ रोजी विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१६, पुणे यांचे मार्फत निवाडा जाहीर करण्यात आला. सदर भूसंपादन प्रस्तावास मा. उच्च न्यायालयात झालेल्या निर्णयानूसार निवाडा व्यपगत झालेला आहे. शासनाचे मान्यतेसाठी विकास योजना आराखडा सादर करण्यात आला आहे. सदरविकास योजनेतील काही आरक्षणे व रस्ते यांस शासनाची अद्याप मंजुरी मिळालेली नाही. संगमवाडी सं.नं. ५४ येथील आरक्षणही यामध्ये समाविष्ठ आहे. शासनाची या आरक्षणांना मान्यता मिळाल्या नंतर भूसंपादनाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**मानकोली व राजनोली उड्डाणपुलाच्या (ता.भिवंडी जि.ठाणे) काम अपूर्ण असल्याबाबत**

**(३४) ९९८३० (३०-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानकोली व राजनोली उड्डाणपुल (ता.भिवंडी जि.ठाणे) या कामाबाबत कार्यारंभ आदेश मागील २ वर्षापूर्वी निघूनही मे.सुप्रीम इन्फ्रा कंपनीकडून काम अद्यापही पूर्ण न झाल्याने चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही उड्डाणपुलाचे काम मूदत संपूनही पूर्ण न केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठया अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उड्डाणपूलाचे काम विलंबाने करणाऱ्या कंपनीविरुध्द व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१८) :** (१) होय.

(२) सदर दोन उड्डाणपुलांपैकी माणकोली येथील उड्डाणपुलाची चार पदरी मार्गिका दि.०८/०४/२०१७ रोजी मुंबई-नाशिक व नाशिक-मुंबई वाहतूकीस खुली केली असून या उड्डाणपुलावरुन मुंबई-नाशिक व नाशिक-मुंबई दिशेकडील वाहतुक सुरु करण्यात आली आहे. उर्वरीत चारपदरी पुलाचे काम प्रगतीपथावर आहे. राजणोली येथील चारपदरी पुलाची कामे दि. ०१/०६/२०१८ पर्यंत तर राजणोली येथील पुलाच्या दुसऱ्या चारपदरी पुलाचे काम दि.०१/१०/२०१८ पर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) सदर काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यात येत असून त्यानुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कंत्राटदारास सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांडपाण्यावर पुनर्चक्रिकरण करुन त्याचा पुनर्वापर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितीतील उद्योगधंद्यासाठी करण्याबाबत**

**(३५) १००२९० (०१-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांडपाण्यावर पुनर्चक्रिकरण करुन त्याचा पुनर्वापर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितीतील उद्योगधंद्यासाठी करण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रकल्पास केंद्र शासनाच्या अमृत योजनेत माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची सुरुवात केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१८) :** (१) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत नवी मुंबई शहरातील प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पास माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे.

• सदर प्रकल्पातील तृतीय स्तरीय प्रक्रिया केलेले पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(२) व (३) सदर प्रकल्प निविदाधीन असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामास सुरुवात होणार आहे.

---

## मुंबई शहरातील चेंबूर आणिक पांजरापोळ जोडरस्ता (पूर्व मुक्त मार्ग) रस्ता (फ्री वे) बोगद्याच्या वरच्या बाजूस संरक्षण भिंत व जाळी लावण्याबाबत

**(३६) १००६५७ (३०-१२-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील चेंबूर आणिक पांजरापोळ जोडरस्ता (पूर्व मुक्त मार्ग) रस्ता (फ्री वे) बोगद्याच्या वरच्या बाजूस संरक्षण भिंत व जाळी लावण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, एमएमआरडीए, बांद्रा, मुंबई यांना वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खेर आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, उक्त प्रकरणी कार्यवाही केली असल्यास त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१८)** :(१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे पूर्व मुक्त रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर प्रकल्पात आणिक-पांजरपोळ जोडरस्ता प्रकल्पांतर्गत दोन बोगदे बांधण्यात आले आहेत. सदर प्रकल्पाच्या सल्लागारास बोगदा व आसपासच्या भागाची वाहतुकीच्या दृष्टीने तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार बोगद्याच्या चारही मुखावर पोर्टलची उभारणी करण्यात आली असून त्याच्या पृष्ठभागावर डोंगरावरुन काही पडल्यास त्यास अटकाव करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच बोगद्याच्या बाहेरील उंच खोदकामाचा पृष्ठभाग दरड कोसळण्याच्या दृष्टीने प्रतिबंधीत करण्यासाठी योग्य लांबीचे बोल्ट व शॉटक्रीटींगच्या थराचे आवरण घालण्यात येऊन अधिक सुरक्षितता निश्चित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरक्षा जाळी बसविण्यात आली आहे.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणाऱ्या विरार-अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पाबाबत**

**(३७) १०१६०३ (०१-०१-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणाऱ्या विरार-अलिबाग कॉरिडॉर या १२६ कि.मी. लांबीच्या प्रकल्पास अंतिमत: मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे कामास केव्हापासून सुरुवात होणार आहे व किती कालावधीत सदर प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) तसेच उक्त प्रकल्पासाठी एकूण किती खर्च येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१८) :** (१), (२) व (३) विरार-अलिबाग या १२६ कि.मी. लांबीच्या बहुउद्देशिय वाहतूक मार्गिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर मान्यतेनुसार या प्रकल्पासाठी रु.९३२६ कोटी खर्च अपेक्षित आहे. केंद्र शासनाच्या वन पर्यावरण विभागाची मान्यता व वन विभागाच्या नियमावलीनुसार सदर प्रकल्पासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अनुषंगाने सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर तसेच भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

**लोहारा (जि.उस्मानाबाद) शहरातील नगरपंचायतीमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३८) १०२४५१ (०१-०१-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (जि.उस्मानाबाद) शहरातील नगरपंचायत स्थापन होऊन जवळपास दिड वर्षांचा कालावधी लोटूनही या ठिकाणी मुख्याधिकाऱ्यांसह पूर्णवेळ बांधकाम अभियंता, लेखापाल, स्वच्छता निरीक्षक, क्षेत्रविकास अधिकारी, शिपाई व सफाई कामगारांच्या जागा अद्यापही रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायती मधील रिक्त पदे भरणेबाबत लोहारा शहरातील लोकप्रतिनिधी यांनी बेमुदत उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८)** : (१), (२) व (३) लोहारा (जि.उस्मानाबाद) नगरपंचायती मधील रिक्त पदे भरणेबाबत लोहारा शहरातील लोकप्रतिनिधी यांनी बेमुदत उपोषण केले होते, हे खरे आहे.

लोहारा नगरपंचायतीमधील मुख्याधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्यात आलेले आहे. नगरपंचायतीमधील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशनाचे अधिकार विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, औरंगाबाद यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यांचेकडून समावेशनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

दरम्यानच्या काळात ४ स्वच्छता कर्मचारी मानधन तत्वावर नेमण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील नगरपरिषद/नगरपंचायतीमधील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी संचालनालयाकडून भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तसेच, नगरपंचायतीतील रिक्त पदांचे अतिरिक्त कार्यभार अन्य नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती (जि.अमरावती) महानगरपालिकेतर्फे वडद परिसरात**
**स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्याबाबत**

**(३९) १०२९४८ (०१-०१-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) शहराचा नियोजित स्मार्ट सिटीमध्ये सहभाग असून नियोजनाप्रमाणे अमरावती महानगरपालिकेतर्फे वडद परिसरात स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्याचे निश्चित करण्यात आले असून या प्रकल्पांतर्गत कामे करण्यासाठी "वडद" गावातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देण्यास विरोधी दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा होईल याकरिता कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(३) असल्यास, वडद येथील शेतकऱ्यांना जमिनी व घरे देण्यासाठी शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१८)** : (१), (२) व (३) • अमरावती महानगरपालिकेमार्फत स्मार्ट सिटी अभियानात चौथ्या फेरीमध्ये उक्त प्रस्ताव समाविष्ट करण्यात आला नव्हता.
• त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीन प्रकल्पाकरीता अधिगृहीत करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

---

**रत्नागिरी नगरपरिषदेत (जि.रत्नागिरी) शासनामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान**
**योजना राबविण्यात येत असल्याबाबत**

**(४०) १०३४१७ (०३-०१-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी नगरपरिषदेत (जि.रत्नागिरी) शासनामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत रु.५४,४१,८९,७०३/- असताना शासनातर्फे रु.१७,५८,००,०००/- चा पहिला हप्ता नगर परिषदेकडे दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास वर्ग करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता कंत्राटदाराची नेमणूक निविदा प्रक्रियेने प्रत्यक्ष पैसे नगरपरिषदेकडे वर्ग करण्यात आल्यापासून १०१ दिवसांमध्ये पूर्ण करून वर्क ऑर्डर देणे शासनाच्या आदेशाप्रमाणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी व सत्ताधारी पक्ष यांनी मे. अन्वी कन्स्ट्रक्शन सांगली यांना कागदपत्र पूर्ण करण्यासाठी नियमबाहय मुदतवाढ दिली असून बेकायदेशीरित्या ठराव मंजूर करून १६.८० टक्के वाढीव रक्कम कंत्राटदारास दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१८) :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत रत्नागिरी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास ऑक्टोबर, २०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार राज्य शासनाच्या हिश्याचा पहिला हप्त्याचा रु.१७.६५०८ कोटी निधी माहे जानेवारी, २०१७ मध्ये रत्नागिरी नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे.

(२) प्रकल्पातील राज्य शासनाच्या हिश्याच्या पहिला हप्ता वितरीत केल्यानंतर एक महिन्याच्या कालावधी निविदा काढणे व तीन महिन्याच्या कालावधीत कार्यादेश देणे व १०१ व्या दिवसापूर्वी कामाचा प्रत्यक्ष प्रारंभ करणे बंधनकारक आहे.

(३), (४) व (५) • सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती प्राप्त लघुत्तम निविदाकारास रत्नागिरी नगरपरिषदेने कार्यादेश दिले आहेत. तथापि, याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

---

**पुणे येथील पीएमपीएमएल प्रशासनाकडून बेरोजगार तरुणांची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(४१) १०३४५७ (०३-०१-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात (जि.पुणे) पुरेशा बस उपलब्ध नसतानाही केवळ महसूल जमा करण्यासाठी पीएमपीएमएल प्रशासनाने साडेतीन वर्षापूर्वी चालक, वाहक व अन्य पदांसाठी भरती प्रक्रीया राबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरतीच्या प्रवेश परिक्षेच्या नावाखाली प्रत्येक उमेदवारांकडून ६०० रुपये घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हजारो बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून कोट्यवधी रुपयांची लूट पीएमपीएमएल प्रशासनाकडून केल्याप्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१८) :** (१) व (२) पुणे महानगर परिवहन महामंडळा मार्फत कंत्राटी कंडक्टर, कंत्राटी ड्रायव्हर पदांची भरती महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) यांचे माध्यमातुन करण्यासाठी जाहिरात दि. ४/२/२०१४ रोजी वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करुन भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती.

या भरतीप्रक्रियेमध्ये जाहिरातीनुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी परिक्षा शुल्क रु. ५००/- व मागासवर्ग उमेदवारांसाठी र.रु. २५०/- परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले होते. सदर शुल्क संबंधित उमेदवारांनी मे. एमकेसीएल यांचेकडे जमा केलेले होते.
(३) व (४) मे.एमकेसीएल यांचे माध्यमातुन करण्यात येणारी पुणे परिवहन महामंडळाच्या सदर भरतीप्रक्रिया रद्द करण्यात आली असून सदर भरती प्रक्रिया रद्द झाल्यामुळे उमेदवारांचे परीक्षा शुल्क परतावा करण्यासाठी दैनिक वृत्तपत्रात, तसेच त्यांच्या भ्रमणध्वनीवर लघुसंदेश करुनही उमेदवारांना त्यांचे बँक तपशिल मागविण्यात आले होते. तपशील प्राप्त होतील तसे त्यांचे परीक्षा शुल्क परतावा करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम स्थगितीचा नियमबाह्य ठराव**

**(४२) १०४७४० (१२-०२-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेरचे उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी यांनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी अतिक्रमण हटाव मोहीम व बेकायदा बांधकाम हटविण्यासाठी योजना तयार केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नगराध्यक्षा यांनी दिनांक ३० मार्च व ०८ एप्रिल, २०१७ रोजी याबाबतचे प्रथमतः आदेश दिले असून त्यानुसार दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास पोलीस बंदोबस्त पुरविण्याची तजबीज करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कायद्याने व नियमाने अतिक्रमण काढण्याची मोहीम अथवा कार्यवाही थांबविण्याबाबत ठराव करण्याचा कुठलाही अधिकार स्थायी समितीस नसतांनाही दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी स्थायी समितीच्या सभेत ही मोहीम स्थगित करण्यासाठी बेकायदेशीरपणे ठराव क्र.५७, विषय क्र.५६ घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिक्रमण हटविणे, मोहीम राबविणे प्रशासकीय बाब असून मोहीमे विरुध्द ठराव अथवा हस्तक्षेप करण्याचा अधिकार नगरपरिषद सदस्यांना नसतांनाही अमळनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा व त्यांचे सहकारी २२ नगरसेवक यांनी अधिकाराचा गैरवापर करुन महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ (ई) चा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असलयास, उपरोक्त प्रकरणी कायद्यांचे उल्लघंन केल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी, मित्र परीवार आघाडीचे गटनेते प्रविण पाठक व इतर यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणाची सुनावणी घेऊन कारवाईबाबतचा अंतिम निकालावर जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यामार्फत अद्याप निर्णय प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१८) :** (१) होय.

(२) पोलीस निरिक्षक, अमळनेर पोलीस स्टेशन यांनी दिनांक १७.०४.२०१७ रोजी अमळनेर नगरपलिका हद्दीतील अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येईल, असे मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद यांना कळविले होते.

(३) अमळनेर नगरपरिषदेच्या स्थायी समितीने ठराव क्र. ५७ अन्वये स्थगिती दिली आहे, हे खरे आहे.

(४), (५) व (६) श्री.प्रविणकुमार पाठक व इतर, अमळनेर यांनी अमळनेर नगरपरिषदेच्या दिनांक ११.०४.२०१७ ठराव क्र. ५७, विषय क्र. ५६ बाबत नगराध्यक्षा व इतर २२ नगरसेवक यांचे विरुध्द महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ (१) ई अन्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे अर्ज दाखल केला.

जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सुनावणीअंती दिनांक २९.०१.२०१८ च्या आदेशान्वये नगराध्यक्षा व इतर २२ नगरसेवक यांना आदेशाचे दिनांकापासून उर्वरित पदावधीसाठी अनर्ह ठरविले आहे.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका परिवहन विभागाच्या १३८ बसेसची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) १०९०७३ (१९-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसच्या दुरुस्तीचे काम एका खाजगी ठेकेदाराला देण्यात आले होते मात्र त्याचा ठेका संपल्याने नादुरुस्त बस विविध ठिकाणी धूळ खात उभ्या असल्याने प्रवासी सुविधांपासून वंचित असून महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन विभागाच्या ताफ्यात एकूण २१८ बस असून त्यातील ७० ते ८० बस धावत असून १३८ बस दुरुस्तीसाठी उभ्या आहेत, उपक्रमाच्या १०० बस दुरुस्तीचे काम शाम्या सर्व्हिस सेंटर यांना ३ वर्षासाठी दिले होते परंतु ४५ बस अत्यंत नादुरुस्त अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्तांमार्फत भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) व (२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका उपक्रमाच्या ताफ्यातील १०० बसेस "वार्षिक देखभाल दुरूस्ती" अंतर्गत प्रति कि.मी. तत्वावर मे. श्यामा शाम सर्व्हिस सेंटर यांना दि. २७.०८.२०१४ अन्वये ०३ वर्षे कालावधीकरीता दुरूस्तीसाठी देण्यात आलेल्या होत्या.

• सदरचा ठेका दि. १०.०९.२०१७ रोजी संपुष्टात आलेला आहे.

• बसेसच्या वार्षिक देखभाल व दुरूस्तीसाठी निविदेची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

• महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात एकूण २१८ बसेस असून त्यापैकी ८५ बसेस मार्गस्थ करणेत येत आहेत.तसेच १३३ बसेस दुरूस्तीसाठी उभ्या आहेत.

• मे. श्यामा शाम सर्व्हिस सेंटर यांना १०० बसेस दुरूस्तीचे काम ०३ वर्षासाठी देण्यात आले होते. त्यापैकी ५५ बस चांगल्या स्थितीत आहेत.

• परिवहन समितीने केलेल्या ठरावानुसार सर्व १०० बसेसचे थर्ड पार्टी इन्स्पेंक्शन करण्याचे निश्चित केले आहे. त्यापैकी ५० बसेसचे थर्ड पार्टी इन्स्पेंक्शन करण्यात आले असून उर्वरित ५० बसेसचे थर्ड पार्टी इन्स्पेंक्शन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) सदर प्रकरणी तत्कालीन परिवहन व्यवस्थापक यांचेमार्फत दि.१५.११.२०१७ अन्वये तत्कालीन प्र. कार्यशाळा व्यवस्थापक यांना "कारणे दाखवा नोटीस" बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी शहरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याबाबत

**(४४) १०९८४१ (१९-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत परभणी महानगरपालिकेने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) • महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ५२(क) नुसार दि.३१.१२.२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित केली जातात.

• यानुसार परभणी शहर महानगरपालिका हद्दीतील दि.३१.१२.२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे "प्रशमित संरचना" म्हणून नियमित करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात तसेच महानगरपालिकेच्या नोटिस बोर्डावर प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.

• या संदर्भात संबंधितांकडून दि.३०.४.२०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले असून प्राप्त होणा-या अर्जावर महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेने शहरातील गुंठेवारी वसाहतींना टँकरने पणीपुरवठा करण्याबाबत

**(४५) ११३४५५ (१९-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेने शहरातील गुंठेवारी वसाहतींना टँकरने पणीपुरवठा करण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदेमध्ये एका कंत्राटदाराने बोगस कागदपत्रे जोडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) • औरंगाबाद शहरातील विविध भागात ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही किंवा कमी दाबाने पाणीपुरवठा होतो अशा भागातील नागरिकांना महानगरपालिकेतर्फे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

• या कामाकरिता मागविण्यात आलेल्या निविदांपैकी एक निविदाधारक मे.पवार वॉटर सप्लायर यांनी पंचायत समिती औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडील सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द सिटी चौक पोलिस स्टेशन,औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलिसखात्यामार्फत सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई क्षेत्रातील अनेक ऑक्रेस्टा, बार, लॉजसह हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारल्या नसल्याबाबत

**(४६) ११४३६४ (१२-०४-२०१८). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील अनेक ऑक्रेस्टा, बार, लॉजसह हॉटेलमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारल्याचा परवाना तसेच आपत्कालीन प्रसंगासाठी उपाययोजना केली गेली नसल्याची बाब दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ऑक्रेस्टा, बार, लॉजसह हॉटेलवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हॉटेल व लॉजिंग व्यवसायाच्या ठिकाणी विभागस्तरावर प्रत्यक्ष तपासणी करून अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन एकूण ३३१ व्यवसाय धारकांपैकी २८ व्यवसाय धारकांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार कार्यवाही करण्यात आलेली असून त्यापैकी ११ व्यवसाय धारकांवर अधिनियमातील नमूना कलम ८ (२) व नियम ११ (१) या नियमाखाली विद्युत व पाणीपुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिलेले आहेत, असे महापालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर शहारात आदेशाचा भंग करुन तत्कालीन सहाय्यक नगर रचनाकार श्रीमती एस.एम.शिंदे यांनी बांधकाम परवाने दिल्याबाबत

**(४७) ११४७२५ (१२-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये लातूर शहरात तीव्र पाणी टंचाई असल्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.आयुक्त, लातूर महानगरपालिका यांना शहरामध्ये नव्याने बांधकाम परवाने देवू नये अशा प्रकारचे पत्र दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन सहाय्यक नगर रचनाकार श्रीमती एस.एम.शिंदे यांनी सदर आदेश झुगारुन तब्बल ५५० बांधकाम परवाने दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशीकरीता श्री.ब.सी.हंगे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरची चौकशी करुन श्रीमती एस.एम.शिंदे या दोषी असल्याबाबातचा अहवाल चौकशी अधिकारी यांनी दिनांक दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर अहवालाबाबत व बांधकाम परवान्यांबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) • श्रीमती एस.एम.शिंदे,तत्कालीन नगर रचनाकार तथा सहाय्यक नगर रचनाकार यांच्यावरील दोषारोप सिध्द झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी रोखून ठेवण्याची शिक्षा त्यांच्यावर बजावण्यात आलेली आहे.
• नागरिकांनी रितसर परवानगी घेऊन पाणी टंचाई समाप्त झाल्यानंतर वैयक्तिक कर्ज मंजूर करुन घेऊन बांधकामे पूर्ण केलेली आहेत. त्यामळे, त्या परवानग्या संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे लातूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर शहरातील पथदिवे बंद असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४८) ११५४४२ (१२-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर शहरातील अनेक भागातील पथदिवे जानेवारी ते आजतागयात महानगरपालिकेने महावितरण कंपनीची बिले न भरल्याने बंद आहेत त्यामुळे शहरातील अनेक भाग अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीची किती रुपयांची देयके लातूर महानगरपालिकेकडे प्रलंबित आहेत व सदर देयके भरण्याबाबत व खंडित वीज पुरवठा पूर्ववत सुरु करून नागरिकांची गैरसोय दूर करण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१८) :** (१)अंशत: खरे आहे.
• लातूर शहरात दि.४.१.२०१८ ते दि.१७.१.२०१८ या ११ दिवसांच्या कालावधीसाठी ४०% पथदिवे बंद होते. तसेच दि.६.२.२०१८ ते दि.१६.३.२०१८ या कालावधीकरिता शहरातील ५०% पथदिवे बंद होते.
• तथापि, तद्नंतरच्या कालावधीत सर्व पथदिवे आजतागायत पूर्ववत सुरु आहेत.

(२) • महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची २००९ पूर्वीची रु.१२६३.३२ लक्ष इतक्या रकमेची विद्युत देयके प्रलंबित आहेत.

• लातूर शहर महानगरपालिकेने डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ च्या पथदिव्यांची विद्युत पुरवठा देयके माहे मार्च,२०१८ मध्ये अदा करुन शहरातील पथदिवे पूर्ववत सुरु करण्यात आले आहेत.

• महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे निधीच्या उपलब्धतेनुसार २००९ पूर्वीची पथदिव्यांची प्रलंबित विद्युत देयके महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर शहरात आयडीया कंपनीने विनापरवानगी कामे केल्याबाबत**

**(४९) ११५४४४ (१२-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरात आयडीया कंपनीने महानगरपालिकेची परवानगी नसतानाही रातोरात रस्ता खोदकाम करून केबल टाकल्याबाबत महानगरपालिकेने सदर प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, किती कामे विना परवानगी लातूर शहरात करण्यात आलेली असून त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१८) :** (१), (२) व (३) • लातूर शहरात आयडीया सेक्युलर कंपनीने महात्मा बसवेश्वर चौक ते राजीव गांधी चौक या रस्त्यावर कीर्ती लॅण्ड ते सुयोग कॉलनीपर्यंत दिनांक १८.११.२०१७ ते १९.११.२०१७ या दरम्यान विनापरवाना डांबरी रस्ता खोदकाम करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केलेले आहे.

• या कारणास्तव संबंधित कंपनीविरुध्द लातूर शहर महानगरपालिकेने विवेकानंद चौक पोलिस स्टेशन, लातूर येथे दि.२६.१२.२०१७ रोजी तक्रार दाखल केलेली असून पुढील कार्यवाही पोलिसांमार्फत करण्यात येत आहे.

• लातूर शहरामध्ये रस्ता खोदून केबल टाकण्याचे वरील प्रमाणे नमूद एकच काम विनापरवानगी झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पश्चिमेकडील मातृअमी गृहनिर्माण संस्थेतील १३२ कुंटूंबाची विकासक मे.अमिशा शेल्टर्स यांनी केलेली फसवणूक**

**(५०) ११५४७७ (१२-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण पश्चिमेकडील (जि.ठाणे) मातृ अमी गृहनिर्माण संस्थेतील १३२ कुटुंबांनी सदर इमारतीच्या विकासक मे.अमिशा शेल्टर्स यांनी संस्थेच्या काही भागासह रस्त्यावर अतिक्रमण केले तसेच इतर सुविधाबाबत आश्वासन देऊनही विकासकाने त्या सुविधा न देता रहिवाशांची फसवणूक केल्यामुळे कल्याण-डौंबिवली महानगरपालिकेकडे मागील २ वर्षांपासून सातत्याने तक्रारी करूनही त्याची महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्यामुळे दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास महानगरपालिकेवर धडक मोर्चा काढून एक सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे.अमिशा शेल्टर्सचे भागीदार गिरीश शहा यांनी महानगरपालिकेकडे सदरच्या इमारतींचे प्लॅन सादर करताना मुख्य रस्त्यापासून एक ६० फूट रूंदीचा रस्ता,नाल्यावर ब्रीच बांधून देणे आदीबाबत स्पष्ट उल्लेख केलेला होता तसेच रहिवाशांना सोलर सिस्टिम, वॉटर हार्वेटिंग, व्हॉल कम्पाऊंड बांधून देण्याचे आश्वासन दिले होते व त्या सुविधा विकासकाने दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांनी महानगरपालिकेकडे विकासकाविरूध्द वारंवार तक्रारी केलेल्या असतानाही महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची कोणतीही दखल न घेता ओसी व सीसी सर्टिफिकेट संस्थेचे बांधकाम अपूर्ण शाळेच्या अनधिकृत बांधकामास एनओसी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्वसंबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) संबंधित विकासक यांनी तक्रारीचे निराकरण न केल्यामुळे सदर भूखंडावरील शाळेचे बांधकाम बंद न केल्याने दि. २९.०१.२०१८ रोजी मातृअमी को.ऑप. सोसायटी मेंबर्स यांनी महापालिका कार्यालयात येऊन प्रत्यक्ष निवेदन सादर केले, ही वस्तुस्थिती आहे.
(२) • सदर भूखंडा शेजारी नाला असल्याने त्याचे पलिकडे विकास योजनेचा ६० फुट रस्त्यापर्यंत जोडरस्ता म्हणून नाल्यावर ५.०० मी. रूंदीचा स्लॅब टाकून पुल बांधण्यात आलेला आहे.
• शाळेकरीता देण्यात आलेल्या परवानगीत पुलाची रूंदी ९.०० मी. इतकी दर्शविण्यात आलेली असून ५.०० मी. रूंद जागेवर पुल झालेला दिसून येत नाही.
• सदर इमारतीच्या तत्कालीन परवानगीमध्ये सोलर सिस्टीम व वॉटर हार्वेस्टिंग या बाबीची अट लागू नसल्याने त्याची पूर्तता करणे विकासकावर बंधनकारक करणे नियमास धरून नाही.

(३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यालयात तक्रार प्राप्त झाल्यानंतर वेळोवेळी विकासास तक्रारीचे निराकरण करणेसाठी महापालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

• विकासकांविरूध्द प्राप्त तक्रारीस अनुसरून सहायक संचालक नगर रचना यांनी दि. ७.०२.२०१८ रोजी स्थळ पाहणी केली, त्यामध्ये हमीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता न झाल्याचे निदर्शनास आल्याने विकासकास काम आहे त्या स्थितीत बंद करणेकरीता दि.०८.०२.२०१८ अन्वये महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**                              **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.**                                 **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**